कुणालाही जिंकायचं असेल तर प्रेमाने जिंका

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार १८ एप्रिल २०२५ | अंक १२७ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु









## गोपीनाथ मुंडे होते तेव्हा इतकी गुंडगिरी नव्हती. त्यामुळे ते पुन्हा पदावर आले तर आम्ही वस्ताद आहेतच, जरांगे पाटील

### महंत नामदेव शास्त्री काय बोलले याच्यावर मी बोलणार नाही, शेवटी गादीचा सन्मान आम्ही करतो

**नेमकं काय म्हणाले जरांगे पाटील?**

महंत नामदेव शास्त्री काय बोलले याच्यावर मी बोलणार नाही, शेवटी गादीचा सन्मान आम्ही करतो. ते काहीही बोलले तरी आम्ही बोलणार नाही. परंतु ते पुन्हा पदावर येणे म्हणजे अन्याय अत्याचार त्या जिल्ह्यातल्या लोकांवर सुरू होणे, त्याचे दुष्परिणाम पुन्हा एकदा सरकारला भोगावे लागतील. कारण आत्ताच मंत्रिपदाचा गैरवापर करून किती गुंडगिरी वाढली होती, ज्यावेळेस गोपीनाथ मुंडे होते तेव्हा इतकी गुंडगिरी नव्हती. त्यामुळे ते पुन्हा पदावर आले तर आम्ही वस्ताद आहेतच, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे



भगवान गडाचे महंत नामदेवशास्त्री यांनी पुन्हा एकदा माजी मंत्री धनंजय मुंडेंची पाठराखण केली आहे. धनंजय मुंडे यांच्यासाठी सर्वांनी मिळून प्रार्थना करा, पहिल्या पदावर येऊन धनंजय मुंडे यांच्या हातून समाजाची सेवा घडावी असं नामदेव शास्त्री यांनी म्हटलं आहे. त्यावर आता मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. ते पुढे बोलताना म्हणाले की, त्या गादीचा आम्ही सन्मान करतो, त्यामुळे आम्ही काही बोलणार नाही. परंतु त्यांच्या अंगावरून वारं गेलं की गालावरून वारं गेलं याच्याशी आम्हाला काही घेणं देणं नाही. त्यावर मी बोलणार पण नाही. धनंजय मुंडे पुन्हा पदावर आले तर पुन्हा गुंडगिरी वाढणार, टोळ्या वाढणार आणि पुन्हा लोक मारणार. आणि पुन्हा एकदा बीड जिल्ह्यावर अन्याय अत्याचार होणार.

ज्या ज्या वेळेस मंत्रिपदाचा दुरुपयोग करून गुंडागिरी सुरू झाली, खंडण्या सुरू झाल्या. आणि लोकांच्या हत्या झाल्या, त्यावेळी जिल्ह्यातल्या सर्व समाजातील लोकांचे मन दुखले. त्यांचा विषय मी बोलणं बंद करून टाकलेला आहे, त्याचं कारण म्हणजे आमचेच धड

## दैनिक लोकआरंभच्या बातमीचा इफेक्ट

### झोपेचं सोंग घेतलेल्या ग्रामपंचायतला आली जाग : बंद केलेला पाणीपुरवठा अखेर सुरु

### संबंधित शेतकऱ्याला ग्रामपंचायत अंतर्गत सेवेत घेतो म्हणून दिले होते आश्वासन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : लोहा तालुक्यातील उमरा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या परसराम तांडा येथे गेल्या १५ दिवसापासून पाण्यासाठी नागरिकांना वणवण भटकावे लागत होते. विशेष म्हणजे परसराम तांडा येथे पिण्याच्या पाण्यासाठी विहिरीची व बोअरवेल ची संख्या कमी असल्याने नागरिकांना व महिलांना २ ते ३ किमी वरून पाणी आणावे लागत होते. मुकेजनावरे ही पंधरा दिवसापासून तहानलेलेच होते. मात्र याबाबतीत लोकआरंभ ने सविस्तर वृत्त प्रसिद्ध केल्याने तहसील पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत प्रशासन खडबडून जागे होऊन पाणीपुरवठा सुरू केल्याने ग्रामस्थाने सुटकेचा निश्वास सोडला. परसराम तांडा येथे २००८ मध्ये भारत निर्माण योजनेतून १६ लक्ष ३३ हजार रुपयांची पाणीपुरवठा योजना कार्यान्वित झाली. तांड्यालगत असलेल्या सुगाव येथील माणिका पांचाळ यांनी विहीर बांधकामासाठी जमीन दान दिली. मात्र जमीन मालक मृत झाले. आता त्यांच्या वारसांकडून आमची जमीन लिजवर दिली होती. ती मुदत संपल्याचे कारण दाखवत अचानक पाणी पुरवठा बंद करण्यात आला.महसूल व पोलिस यांनी जमीन मालकास समजावून सांगितले आणि त्यांनी पाणीपुरवठा सुरू केला. २००८ पासून ज्यावेळी शासनाने आमच्या शेतात विहीर खोदून दिली तेव्हापासून आम्ही परसराम तांड्याला पाणीपुरवठा करतो पण मध्यंतरीच्या काळात उमरा ग्रामपंचायतने पाणीपुरवठ्यासाठी तुम्हाला ग्रामपंचायत मध्ये सेवा देतो असे आश्वासन दिल्याने आम्ही कुठलाही मोबदला न घेता गेली १५ वर्षांपासून परसराम तांड्याला पाणी सोडण्यासाठी सेवा दिली पण त्यांनी वेळोवेळी आम्हाला भूलथापा दिल्याचे संबंधित शेतकरी पांचाळ यांनी सांगितले. याबाबतीत दैनिक लोकआरंभ ने वृत्त प्रसिद्ध करताच बहुसंख्य ग्रामस्थांनी ग्रामपंचायत व पंचायत समिती प्रशासनाला जाब विचारला, तर उमरा ग्रामपंचायत प्रशासनाची देखील धावपळ उडाली होती. त्यामुळे अखेर ग्रामपंचायतीने पंचायत समितीकडे पाठपुरावा केल्याने तात्काळ परसराम तांड्याला पाणीपुरवठा सुरू केल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करून दैनिक लोकआरंभ व प्रशासनाचे आभार मानले.यावेळी मंडळ अधिकारी,तलाठी,सरपंच ग्रामपंचायत अधिकारी पोलीस बिट जमादार आदी उपस्थित होते.

## बाबासाहेब आगे यांच्या कुटुंबाची जबाबदारी मंत्री पंकजा मुंडेंनी स्विकारली

बीड। प्रतिनिधी भाजपचे लोकसभा विस्तारक बाबासाहेब आगे यांच्या निघृ ण हत्येनंतर त्यांच्या कुटुंबाची जबाबदारी राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मु ंडे यांनी स्विकारली आहे. आगे यांच्या हत्येने मन सुन्न झाले, एक धडाडीचा कार्यकर्ता मी गमावला आहे अशा शब्दांत त्यांनी आपल्या शोक भावना व्यक्त केल्या आहेत. बाबासाहेब आगे यांची निघृ ण हत्या झाल्याची बातमी जेव्हा कानावर आली, ते ऐकून मन सुन्न झाले. काहीच सुचत नव्हते, त्यामुळे एका दिवसानंतर ना. पंकजाताई मु ंडे यांनी या घटनेवर आपल्या शोक भावना व्यक्त केल्या आहेत. आगे हे भाजपचे धडाडीचे कार्यकर्ते होते, संघाचे संस्कार त्यांचेवर असल्याने प्रत्येकाच्या मदतीला धावून जाण्याचा त्यांचा स्वभाव होता. माझ्या लोकसभा निवडणुकीत बुथ विस्तारक म्हणून अतिशय महत्वाची जबाबदारी त्यांनी खूप मेहनतीने पार पाडली. अशा मनमिळावू कार्यकर्त्याची अशा प्रकारे निघृ ण हत्या झाली हे ऐकून मनाला खूप वेदना झाल्या. या घटनेचा मी तीव्र निषेध करते. जिल्हयात आल्यानंतर पहिल्यांदा त्यांच्या पत्नी व कुटुंबाची भेट घेणार आहे. त्यांच्यावर कोसळलेल्या दुःखात माझा परिवार सहभागी आहे. आगे यांच्या कुटुंबाची जबाबदारी मी घेणार असून त्यांना सर्वतोपरी मदत करेल असं ना. पंकजाताई मु ंडे यांनी म्हटलं आहे

## ऑलिम्पिक वीर अविनाश साबळे यास राज्यस्तर शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार आज पुणे येथे पुरस्कार वितरण सोहळा



बीड, दि.17 ऑलिम्पिक मधून बीडचे नाव जगाच्या पातळीवर नेणाऱ्या अविनाश साबळे याला शिवछत्रपती राजे क्रीडा पुरस्कार जाहीर झाला असून उद्या शुक्रवार दिनांक 18 एप्रिल रोजी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार त्याला दिला जाणार आहे. म्हाळुंगे - बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे सकाळी 11 वाजता हा पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे.

रुपये 3 लाख, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अविनाश साबळे सध्या भारतीय सैन्य दलात कार्यरत असून बंगलूरु येथील सदर्न साई सेंटर येथे प्रशिक्षण घेत आहे.

जिल्हाधिकारी अविनाश पाठक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी तसेच शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते प्रा.जे. पी. शेळके तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर आदींनी साबळे यांचे अभिनंदन केले आहे.

## खरीप हंगाम २०२५ जिल्हास्तरीय कार्यशाळा प्रशिक्षण वर्ग संपन्न

बीड, दि.17 खरीप हंगाम 2025ची पूर्वतयारी व नियोजनाकरिता जिल्हा अंतर्गत कृषी विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची एकदिवसीय कार्यशाळा बुधवार दिनांक 16 एप्रिल 2025 रोजी बीड येथे संपन्न झाली.या कार्यशाळेस विभागीय कृषी सहसंचालक पी.आर. देशमुख छत्रपती संभाजीनगर, अधीक्षक कृषी अधिकारी विभागीय कृषी सहसंचालक माधुरी सोनवणे छत्रपती संभाजी नगर, जिल्हाध्यक्ष कृषी अधिकारी बीड, एस. एम. साळवे, नोडल अधिकारी तथा अधिक्षक अभियंता व प्रशासक पल्लवी जगताप, लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण बीड, डी.व्ही. जाधवर, कृषी उपसंचालक एस एस सय्यद, कृषी विकास अधिकारी बीड तसेच सर्व उपविभागीय अधिकारी उपस्थित होते.यावेळी येणाऱ्या आगामी खरीप हंगाम 2025 ची पूर्वतयारी व नियोजना बाबत क्षेत्रीय स्तरावर करावयाच्या विविध मोहिमा यामध्ये माती परिक्षण मोहिम, घरगुती बियाणे उगवण क्षमता चाचणी मोहीम, बीज प्रक्रिया मोहिम, हुमणी किड निमंत्रण मोहीम, खरीप पिकाच्या तंत्रज्ञान प्रसारासाठी गावनिहाय प्रशिक्षण मोहीम, कृषी निविष्ठांच्या वाजवी वापराबाबत जनजागृती मोहीम, आपत्कालीन पीक नियोजन कार्यशाळा प्रशिक्षण सत्रे इत्यादी करिता दिलेल्या वीत वेळ वेळापत्रकानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत पी.आर. देशमुख विभागीय कृषी सहसंचालक यांनी सादरीकरणाद्वारे सविस्तर व सखोल मार्गदर्शन केले.आगामी खरीप हंगामाकरिता खते, बियाणे व आवश्यक निविष्ठा यांचे मान्सून आगमनाच्या पूर्वीच तालुका न्याय पुरवठा नियोजन तसेच त्यांच्या गुणवत्ता नियंत्रणाच्या अनुषंगाने आवश्यक कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले.सदर कार्यशाळेत जिल्ह्यातील कृषी विभागाचे सर्व कृषी सहाय्यक, कृषी प्रर्यवेशक, मंडळ कृषी अधिकारी, कार्यालय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी, जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक, उपविभागीय कृषी अधिकारी तसेच सर्व तंत्र अधिकारी उपस्थित होते.याप्रसंगी जिल्ह्यातील कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या विविध शेतकरी गटाच्या तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मान्यवराच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी एस.एम. साळवे तर आभार प्रदर्शन कृषी उपसंचालक डी.व्ही. जाधवर यांनी केले.

******

## मग खरा जातीवाद कोण करतं? महंत नामदेव शास्त्रींच्या त्या विधानानंतर भागचंद महाराज संतापले!

प्रसिद्ध कीर्तनकार भागचंद महाराज झांजे यांनी भगवानगडाचे महंत महंत नामदेवशास्त्री यांच्यावर टीका केली आहे. भगवान बाबा मारतात तेव्हा काठीचा आवाज येत नाही. मात्र जीवन उद्धस्त होतं. तुम्ही मराठा समाजाचे 50 मुले सांभाळून समाजावर उपकार करता का? अशा शब्दांत त्य भागचंद महाराज यांनी नामदेवशास्त्रींवर टीका केलीय.

भगवानबाबांची काठी कुणालाही लागलेली नाही- भागचंद महाराज"आज नारळी सप्ताहानिमित्त नामदेव महाराज शास्त्री यांनी एक वक्तव्य केलं. संत भगवानबाबांची काठी लागली तर कुणाला कळत नाही, असं ते म्हणालेत. मात्र भगवानबाबांच्या चरित्रामध्ये त्यांची काठी कुणालाही लागल्याचा उल्लेख नाही. आजही भाविक-भक्त संत भगवानबाबांना मानतात. कारण त्यांच्याच कृपेमुळे असंख्य भक्तांचं कल्याण झालं आहे. म्हणूनच खऱ्या अर्थाने संत भगवानबाबांसाठी महाराष्ट्रातील, देशातील, परदेशातील भाविक येतात. भगवानबाबांची काठी कुणालाही लागलेली नाही. तसा कुठेही उल्लेख नाही," अशी घणाघाती टीका भागचंद महाराज यांनी केली. मग खरा जातीवाद कोण करतो? तसेच "आम्ही 200 मुले सांभाळतो. त्यातील 50 मुले ही मराठा समाजाची आहेत. कधी आळंदीला जा. तिथे कितीतरी मुलं रोज वारकरी संप्रदायामध्ये घडतात. तिथे कधीच जात विचारली जात नाही. संत भगवानबाबांनीही कधीच कुणाच्या जातीचा उल्लेख केलेला नाही. त्यांनी कधी कुणाचा धर्म विचारला नाही. आज तुम्ही 50 मुलं सांभाळून जात काढता. वरून म्हणता की जातीवाद करू नका. मग खरा जातीवाद कोण करतो? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. "जर तुम्ही जातीचा उल्लेख करून एवढी मुलं सांभाळतो असे सांगता. मग तुम्ही एखाद्या समाजावर उपकार करता का. संत भगवानबाबा यांचे फक्त एकाच समाजातील भक्त आहेत का? तुम्ही एवढ्या उंचीवरच्या व्यक्ती आहात. तुमच्या तोंडून हे वाक्य शोभत नाही,"




असाही हल्लाबोल भागचंद झांजे महाराजांनी केला नामदेवशास्त्री काय म्हणाले होते? संत भगवानबाबा गडाचा नारळी सप्ताहाची सांगता बीडच्या शिरूर कासार तालुक्यातील पिंपळनेर येथे पार पडली. यावेळी भगवानबाबा गडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी माजी मंत्री धनंजय मुंडे यांची वाणी बंद पडलेली आहे. त्यांच्यासाठी सर्वांनी प्रार्थना करा, असे आवाहन केले. तसेच पुढे बोलताना भगवानबाबा जेव्हा मारतात तेव्हा त्यांच्या काठीचा आवाज येत नाही. भगवानगडाशी छेडछाड करु नका, असेही नामदेवशास्त्रींनी म्हटलंय. भगवानबाबांच्या काठीचा उल्लेख करून महंत नामदेवशास्त्रींनी केलेल्या याच विधानाचा समाचार भागचंद महाराजांनी घेतलाय.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार १८ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

## मेहुल चोक्सीला त्याच्या कर्माचे फळ द्यावे

पंजाब नॅशनल बँकेत कोट्यवधींचा घोटाळा करणाऱ्या मेहुल चोक्सी याच्या प्रत्यार्पणाची विनंती भारताने केल्यानंतर बेल्जियम पोलिसांनी त्याला अटक केली. कोट्यावधींचा कर्ज घोटाळा करून तो पळाला होता. १३ हजार ५०० कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप मेहुल चोक्सी आणि त्याचा भाचा नीरव मोदीवर आहे. ईडी आणि सीबीआयने त्याला ङ्गवॉण्टेडफ जाहीर केले होते. काही दिवसांपूर्वी चोक्सी आजारी असल्याची माहिती समोर आली होती. त्याला कर्करोग झाल्याची शक्यताही वर्तवण्यात आली होती. मेहुल चोक्सीवर नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यांच्या कायद्यानुसार फरार आर्थिक गुन्हेगार घोषित केल्यास चोक्सीच्या जप्त केलेल्या साऱ्या संपत्तीवर टाच आणण्याची प्रक्रिया तपास यंत्रणेने सुरू केली आहे. त्यामुळे त्याची आर्थिक कोंडी करणे शक्य होईल. मात्र, चोक्सीने प्रकृती अस्वास्थ्याचे कारण देऊन तूर्तास भारतात परतणे शक्य नाही असे त्याच्या याचिकेत म्हटले आहे. त्यामुळे चोक्सी भारतात येण्याची प्रक्रिया लांबू शकते. मेहुल चोक्सीचा पासपोर्ट भारत सरकारने रद्द केला आहे. पीएमएलए न्यायालयात चोक्सीच्या पासपोर्ट निलंबनासंदर्भातील कागदपत्रे आणि त्याच्याविरुद्ध ईडी प्रकरणाच्या तपास फाईल्स मागवण्याचे निर्देशही यापूर्वी देण्यात आले होते. बेल्जियम पोलिसांनी चोक्सीला अटक केल्याने आता त्याच्या प्रत्यार्पणाचा मार्ग मोकळा झाल्याचे म्हटले जात आहे. सुमारे १४ हजार कोटी रुपयांच्या पंजाब नॅशनल बँक (पीएनबी) घोटाळ्यातील आरोपी मेहुल चोक्सीला कर्करोगाची लागण झाली असून, तो बेल्जियममध्ये एका खासगी रुग्णालयात उपचार घेत असल्याची माहिती त्याच्या वकिलांनी फेब्रुवारी महिन्यात मुंबईतील ईडीच्या विशेष न्यायालयात दिली होती. त्यानुसार शनिवारी बेल्जियम पोलिसांनी एका खासगी रुग्णालयातून त्याला अटक केली. पीएनबी घोटाळ्यातील मुख्य आरोपी नीरव मोदी याचा मेहुल चोक्सी हा मामा आहे. या मामा भाच्यानी पंजाब नॅशनल बँकेच्या काही उच्चपदस्थ अधिकाऱ्यांशी संगनमत करून बँकेची बनावट हमीपत्रे (लेटर ऑफ अंडरटेकिंग) तयार केली. या बनावट हमीपत्रांच्या सहाय्याने त्यांनी परदेशात बँकांकडून मोठ्या रकमेची कर्जे मिळवली. तसेच परदेशात क्रेडिट सुविधा मिळवून बँकेची सुमारे १४ हजार कोटी रुपयांची फसवणूक केली, असा आरोप आहे. ६५ वर्षीय चोक्सी हा भारतातील गीतांजली जेम्स लि. या कंपनीचा मालक आहे. त्याच्या हिरेजडित दागदागिन्यांची निर्मिती करणारा उद्योग २०१८ मध्ये पीएनबी घोटाळा उघड झाल्यानंतर बंद पडला. त्याच वर्षी चोक्सी भारताबाहेर फरार झाला. सुरुवातीला त्याने अँटिग्वा अँड बर्मुडा या देशाचे नागरिकत्व मिळवले. गतवर्षी तो बेल्जियममध्ये वास्तव्यास आला. भारतीय तपास यंत्रणांना गेली सात वर्षे गुंगारा देणाऱ्या चोक्सीला अटक होण्याची ही पहिलीच वेळ नाही. या आधी मे २०२१ मध्ये त्याला डोमिनिका देशात बेकायदेशीरपणे प्रवेश केल्याच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली होती. तेव्हादेखील भारतीय तपास यंत्रणांनी त्याच्या प्रत्यार्पणासाठी प्रयत्न केले होते. मात्र, डोमिनिकाच्या न्यायालयाने त्याला वैद्यकीय उपचारासाठी पुन्हा ॲन्टिग्वाला जाण्याची परवानगी दिल्याने प्रत्यार्पणाचे प्रयत्न अपयशी ठरले होते. त्यानंतर ईडीने चोक्सीशी संबंधित २ हजार ५०० कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली. न्यायालयाने या मालमत्तांचा लिलाव करण्यास परवानगी दिली आहे. चोक्सी भारतातून पळाल्यानंतर कॉंग्रेस नेत्यांनी भाजपवर तोफा डागल्या होत्या. केंद्रात भाजपचे सरकार होते. भाजपने त्याला पळून जाण्यासाठी मदत केली. सरकारच्या अकार्यक्षमतेमुळे त्याला परत आणणे शक्य होत नसल्याचा दावाही कॉंग्रेस नेत्यांनी केला होता. चोक्सी भारतातून पळाल्यानंतर कॉंग्रेसने मोठा गदारोळ केला होता. ङ्गसगळेच मोदी चोर असतातफ असे विधान करण्यापर्यंत मजल गेली होती. या विधानाच्या विरोधात राहुल गांधी यांच्या विरोधात खटला दाखल करण्यात आला होता. भारताने जागतिक महाशक्ती असलेल्या अमेरिकेतून दहशतवादी तहव्वूर राणाला भारतात आणले आहे. त्या तुलनेत चोक्सी याला भारतात आणणे सोपे आहे. कारण त्याला बेल्जियममध्ये अटक झाली आहे. हिरे व्यापारी चोक्सी आणि नीरव मोदी यांनी पीएनबी बँकेला चुना लावून भारताबाहेर पलायन केले. तहव्वूर राणाच्या पाठोपाठ आता चोक्सी आणि नीरव मोदी भारतात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विजय माल्ल्या, मेहुल चोक्सी, नीरव मोदी, ललित मोदी, नितीन संदेसरा या लफडेबाजांच्या मुसक्या बांधून त्यांना भारतात आणले पाहिजे. त्यांनी केलेल्या कर्माचे फळ त्यांना दिलेच पाहिजे.

## आपले सरकार पोर्टलवर अधिसूचित सेवा उपलब्ध करण्यात दिरंगाई करणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांना दरदिवशी एक हजार रुपयांचा दंड लावणार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

### सर्वसामान्य नागरिकांना देण्यात येणाऱ्या सुविधा-लाभांच्या सनियंत्रणासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे ट्रॅकिंग प्रणाली आणखी मजबूत करा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### 'ॲग्रीस्टॅक'च्या अद्ययावतीकरण आणि वापराबाबत यंत्रणा उभारा – मुख्यमंत्री

### शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या भविष्यातील विस्तारासाठी किमान 20 एकर जागा राखीव ठेवण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या सूचना

मुंबई, दि. १७ :- राज्य शासनाने सेवा हक्क अधिनियमांतर्गत १०२७ सेवा अधिसूचित केल्या असून त्यापैकी ५२७ सेवा 'आपले सरकार' पोर्टलवर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. प्रशासकीय विभागांनी त्यांच्या सर्व अधिसूचित सेवा पोर्टलवर उपलब्ध करून द्याव्यात. यात दिरंगाई करणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखाला दरदिवशी एक हजार रुपयांचा दंड लावण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्य सचिवांना केल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात विविध सामाजिक क्षेत्रांची वॉररुम बैठक पार पडली. या बैठकीत आदिवासी विकास विभागाच्या विविध योजना, आपले सरकार पोर्टलवरील अधिसूचित सेवा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे कार्यान्वयन, ॲग्रीस्टॅक उपक्रम यांचा आढावा घेण्यात आला.

राज्यातील नागरिकांना पारदर्शक आणि विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे सांगून श्री. फडणवीस म्हणाले, आपले सरकार पोर्टलवर विविध विभागांच्या १३८ इंटिग्रेटेड सेवा ३१ मे २०२५ पर्यंत उपलब्ध करून देण्यात याव्यात. तसेच उर्वरित ३०६ अधिसूचित सेवा १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन कराव्यात. याप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत ऑनलाईन सेवा उपलब्ध करण्यास दिरंगाई करणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांवर दरदिवशी एक हजार रुपयांचा दंड लावण्याची कारवाई करण्यात यावी. यासंदर्भात मुख्य सचिवांनी परिपत्रक काढावे, असे निर्देशही त्यांनी दिले.

सेवा हक्क अधिनियमासंदर्भात पुढील प्रक्रिया राबविताना कोणकोणत्या नवीन सेवा अधिसूचित करता येतील, याबाबत १५ सप्टेंबरपर्यंत माहिती द्यावी. सेवा ऑनलाईन करण्याच्या प्रक्रियेचे प्रमाणीकरण करण्याची कार्यवाही 'महाआयटी'ने करावी. एका अर्जाच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभ घेता यावा याद्दष्टीनेही प्रक्रियेत बदल करावा. ऑक्टोबरपर्यंत जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आपला महाराष्ट्र देशात अव्वल व्हावा याद्दष्टीने प्रयत्न करावा, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे ट्रॅकिंग प्रणाली आणखी मजबूत करा- मुख्यमंत्री

आदिवासी, शेतकरी, विद्यार्थी यांच्यासह सर्वसामान्य नागरिकांना सामाजिक सुरक्षा प्रदान करतानाच त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा-लाभांच्या स्थितीची रिअल टाईम माहिती उपलब्ध होण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ट्रॅकिंग प्रणाली आणखी मजबूत करण्यावर भर द्या, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

आदिवासी विकास विभागाच्या योजनांचा आढावा घेताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, आदिवासी कुटुंबांना योजनांचा लाभ देण्यासह त्यांच्या वाड्या-पाड्यांना पायाभूत सुविधा देण्याच्या कामास गती देण्यात यावी. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियानांतर्गत (PM JANMAN) येणारी सर्व उद्दिष्ट्ये वर्ष २०२६ अखेर पूर्ण करावीत. आदिवासी भागातील मोबाईल मेडिकल युनिटचे जिओटॅगिंग करावे, घरोघरी नळ योजनेसाठी ग्रामसभेचा ठराव घ्यावा. पूर्ण झालेली बहुद्देशीय केंद्रे ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करा. आदिवासी बांधवांना पक्की घरे बांधून देण्याच्या कामाला गती द्या. जमीन अधिग्रहणासाठी आदिवासी विकास विभागाने विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करून देऊन उर्वरित रस्ते पूर्ण करून घ्यावेत. नाशिक, नंदुरबार, पालघर, ठाणे जिल्ह्यातील आदिवासी बांधवांचे दावे लवकरात लवकर निकाली काढून त्यांच्या नावावर ७/१२ करून देण्यात यावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.



'प्रधानमंत्री धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियाना'तून आदिवासी भागात परिवर्तन करता येणार- मुख्यमंत्री

गेल्या वर्षीच्या २ ऑक्टोबरला केंद्र शासनामार्फत सुरु करण्यात आलेल्या 'प्रधानमंत्री धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियाना'ची (PM DA-JGUA) अंमलबजावणी राज्य शासनाच्या १०० दिवस कृती आराखड्यांतर्गत करण्यात यावी. आदिवासी बांधवांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आखण्यात आलेल्या या योजनेतून आदिवासी भागात परिवर्तन करता येणार आहे. त्यामुळे आदिवासी लोकसंख्या असलेल्या ३२ जिल्ह्यांमध्ये या अभियानाची प्रभावीपणे कार्यवाही करावी. जिल्हास्तरीय समित्यांच्या माध्यमातून विविध १७ प्रशासकीय विभागांमधील २१ उपक्रमांची वाड्या-पाड्यांपर्यंत अंमलबजावणी करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या भविष्यातील विस्तारासाठी किमान २० एकर जागा राखीव ठेवण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या सूचना

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी राज्यातील १० नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या कार्यान्वयनाचा आढावा घेतला. या महाविद्यालयांच्या उभारणीला गती देण्यासाठी त्यातील अडचणी तातडीने सोडविण्याच्या संबंधितांना सूचना केल्या. अंबरनाथ, वर्धा, पालघर येथील महाविद्यालयांसाठी जागा निश्चित करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

भविष्याचा विचार करूनच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची उभारणी केली पाहिजे. महाविद्यालयांना जागा उपलब्ध करून देताना भविष्यात त्यांचा विस्तार करता यावा यासाठी किमान २० एकर जागा राखीव ठेवावी. नवीन महाविद्यालयांसाठी १४८९ पदांची मागणी करण्यात आली असून त्यापैकी ३०० पेक्षा जास्त पदे अजूनही भरली गेली नाहीत. त्यामुळे एमपीएससीमधून तांत्रिक पदे वगळण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीसमोर आणावा, असे निर्देशही श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले.

'ॲग्रीस्टॅक'च्या अद्ययावतीकरण आणि वापराबाबत यंत्रणा उभारा – मुख्यमंत्री

'ॲग्रीस्टॅक'च्या नोंदणीत देशात तिसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या महाराष्ट्राला 'शेतकरी ओळखपत्र नोंदणी'त पहिल्या क्रमांकावर आणण्यासाठी नोंदणीची प्रक्रिया गतिमान पद्धतीने राबवावी. शेतकऱ्यांची नोंदणी, हंगामी पिकांची माहिती, ई-पिक पाहणी, गाव नकाशांची माहिती उपलब्ध करताना अचुकता व गुणवत्तेवर भर द्यावा. ॲग्रीस्टॅकच्या अद्ययावतीकरण आणि वापराबाबत यंत्रणा उभारावी, असे निर्देश मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

'ॲग्रीस्टॅक' उपक्रमांतर्गत १ कोटी १९ लाख शेतकरी ओळखपत्र नोंदणीचे उद्दिष्ट असून आतापर्यंत ९२ लाख ३५ हजार शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण झाली आहे. कृषी गणना २०२१-२२ नुसार १ कोटी ७१ लाख १० हजार ६९७ शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येत असून त्यापैकी ७८ लाख ७५ हजार ४७७ शेतकऱ्यांची नोंदणीही ठराविक कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावा, असे मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले.

यावेळी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक ऊईके, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, मेघना बोर्डीकर, योगेश कदम यांच्यासह वरिष्ठ सनदी अधिकारी, जिल्हाधिकारी आदी उपस्थित होते.

------०००------

## चाईल्ड प्रायमरी स्कुल चे वार्षिक स्नेहसंमेलन

### उत्साहात;विद्यार्थ्यांच्या बहारदार नृत्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली.

केज/प्रतिनिधी:-

केज येथील चाईल्ड प्रायमरी स्कुल चे वार्षिक स्नेह संमेलन १३ एप्रिल रोजी सायंकाळी उत्साहात संपन्न झाले. स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे उदघाटक रंजित आडसकर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.हनुमंत सौदागर ,मुख्यअतिथी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडस्कर , केंद्रप्रमुख संजय चौरे आदी उपस्थित होते. उद्घाटक रंजीत द आडसकर यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. शाळेच्या प्रगती विषयी अभिनंदन केले. गटशिक्षणाधिकारी यांनी कार्यक्रमास शुभेच्छा देऊन पालकांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप डॉ.हनुमंत सौदागर यांनी करताना म्हणाले स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास




होतो असे मत त्यांनी व्यक्त केले. विविध क्षेत्रातील मान्यवर सरपंच उपसरपंच सदस्य सर्व पत्रकार मंडळी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्तावित संस्थेचे अध्यक्ष शरद गिराम यांनी केले तर आभार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ताजी मुजमुले व प्रकाश काळे यांनी केले आभार प्रा.डॉ.नागेश कराळे यांनी मानले. विद्यार्थ्यांचा बहारदार कार्यक्रमाने जिंकली उपस्थित मान्यवरांची मने _ शाळेतील विद्यार्थ्यांच्या सदाबहार कार्यक्रमाची सुरुवात ही प्रथम गणेश भक्ती गीताने झाली व नंतर पोवाडा,नाटिका,जनजागृती करणाऱ्या नाटिका यांवर विशेष भर देऊन शाळेतील विद्यार्थ्यांनी हिंदी मराठी गाण्यांवर नृत्य सादर करत उपस्थित मान्यवरांची पालकांची मने जिंकली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्रीमती शिंदे,श्रीमती आंधळे,श्रीमती गिरी,श्रीमती पांचाळ,श्रीमती साखरे ,श्रीमती चिंचोलीकर, भाऊसाहेब शिंदे, सचिन गिराम,भीमराव गिराम ,अनिल चटप,बिरुदेव भंडारे,अनिल चटप,गणेश तपसे, प्रकाश काळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नांदेड जिल्ह्यासाठी हवामान खात्याचा इशारा 18,19, व 20 एप्रिल रोजी येलो अलर्ट जारी

### तीन दिवस उष्ण व दमट हवामान राहण्याची शक्यता

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी 18, 19 व 20 एप्रिल हे तीन दिवस येलो अलर्ट जारी केलेला आहे. या तीन दिवसांच्या काळात जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी. नागरिकांनी खबरदारीची उपाययोजना म्हणून पुढील प्रमाणे काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

काय करावे :- तहान नसली तरी पुरेसे पाणी प्या. अपस्मार, हृदयरोग, मूत्रपिंड, यकृतविषयक आजारांमुळे ज्यांना शरीरात द्रवपदार्थ टिकवण्याचा प्रश्न येतो, त्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानंतरच द्रवपदार्थ किंवा पाणी प्राशन करावे. ओआरएस (ORS) म्हणजेच तोंडान घ्यावयाचे शरीरातले पाणी वाढवणारे द्रवपदार्थ, घरगुती लस्सी, भाताची पेज, लिंबूपाणी, ताक, नारळाच पाणी घ्या. हलक्या रंगाचे, वजनाला हलके आणि सैलसर सुती कपडे वापरा. घराबाहेर असाल तर डोके झाका. एखादे कापड वापरा, टोपी घाला किंवा छत्री वापरा. डोळ्यांच्या सुरक्षेसाठी गॉगल वापरा आणि उन्हापासून कातडीचाही बचाव करायला सनस्क्रीन वापरा. अतिउष्णतेमुळे ज्यांना सर्वाधिक हानी पोहोचेल असे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, आजारी किंवा स्थूल व्यक्तींची विशेष काळजी घ्या.

काय टाळावे :- उन्हात जायचे टाळा, विशेषतः दुपारी १२ ते ०३ मध्ये दुपारी बाहेर असताना श्रमाची कामे टाळा. अनवाणी बाहेर जाऊ नका. अतिउष्णतेच्या काळात स्वयंपाक करणे टाळा. दार खिडक्या उघड्या ठेऊन अन्न शिजवण्याचे क्षेत्र स्वयंपाकघर हवेशीर राहील हे बघा. अल्कोहोल म्हणजे दारू, चहा, कॉफी, शीतपेये टाळा त्यातून शरीरातले पाणी कमी होते. उच्च प्रथिनयुक्त मिठाचं प्रमाण जास्त असलेले किंवा तिखट तसेच तेलकट अन्न खाऊ नका. शिळंपाकं खाऊ नका.चारचाकी वाहन लावून ठेवताना त्यात लहान मुले किंवा प्राणी ठेऊ नका. चमकणारे दिवे किंवा बल्ब्ज वापरू नका, त्यातून अनावश्यक उष्णता निर्माण होते.



माजलगाव- माजलगावाती राजस्थानी महिलांच्या वतीने गणगौर उत्सव मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरण साजरा करण्यात आला. यात विविध संस्कृतीक व सामाजिक कार्यक्रम सादर करण्यात आले होते या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती मंगलाताई सोळंके व सुरेखा जेथलिया ह्या लाभल्या तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनुराधा बजाज ह्या होत्या. संस्कृतीक कार्यक्रमात राजस्थानी घूमर, कालबेलिया,तेहरातली व विविध नृत्य सादर करण्यात आले. कृष्णा कलंत्री व क्रिशा चांडक इसार गौर ची वेशभूषा सादर करून या कार्यक्रमाची शोभा वाढवली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता लोहिया व अर्चना कलंत्री यांनी केले या कार्यक्रमास माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रमाचा सर्व महिला खुप आनंद घेतला. माहेश्वरी महिला सभेच्या वतीने का कार्यक्रमास विशेष सहकार्य लाभले.

# परळीत एक वही एक पेन अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद

परळी । प्रतिनिधी महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत एक वही एक पेन हे अभियान परळी शहरात बाबासाहेबांच्या जयंती दिनी राबविण्यात आले. या अभियानास महाराष्ट्राचे माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी भेट दिली तसेच यावेळी त्यांनी या अभियानाचे कौतुक केले व त्यांच्या हस्ते चिमुकल्यांना वही,पेनचे वाटप करण्यात आले. रेल्वे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात युवा कार्यकर्ते विकास रोडे व पत्रकार विकास वाघमारे यांच्या संकल्पनेतून एक वही एक पेन अभियानाचे उद्घाटन इंटक चे युवक प्रदेश अध्यक्ष माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी दिली भेट दत्तात्रय गुट्टे, रेल्वे पोलीस निरीक्षक बी.एस.कांबळे तर अध्यक्ष स्थानी मुफ्टाचे जिल्हा अध्यक्ष भैय्यासाहेब आदोडे होते.प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध विचारवंत अजयकुमार गंडले,लेखक, दिग्दर्शक प्रा.डॉ. सिद्धार्थ तायडे, जेष्ठ पत्रकार व साहित्यिक भीमयुगकार रानबा गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते विठ्ठलराव झिलमेवाड, संपादक अनिल सावंत, पृथ्वी शिंदे,पत्रकार संभाजी मु ंडे, पत्रकार दत्ता काळे,सुजीत कांबळे, पत्रकार ओमप्रकाश बुरांडे, पत्रकार धीरज जंगले, अनंत कुलकर्णी,पत्रकार महादेव शिंदे, पत्रकार विजय रोडे,वसंतोष कोदरकर,डोंबे मामा, शिवाजीराव बनसोडे आदी उपस्थित होते. या अभियानास माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या सह रिपाईचे राज्य सचिव भास्कर नाना रोडे,भाजपाचे शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, जिल्हा परिषदेचे गट नेते अजय मुंडे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे,प्रा . दासू वाघमारे,सामाजिक कार्यकर्ते डॉ.विनोद जगतकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, सिराजभाई,अनंत इंगळे,रवी मुळे, महेंद्र रोडे ,भीमराव डावरे,प्रा.विलास रोडे, सुभाष वाघमारे,विलास ताटे , अॅड.दिलीप उजगरे,लक्ष्मण वैराळ सर,मारोती वाघमारे आदी उपस्थित होते



बीड । प्रतिनिधी शिरूर कासार तालुक्यातील राक्षसभुवन (तांबा) येथील श्री क्षेत्र नारायणगडाच्या ७३ व्या आणि पिंपळनेर येथील श्री क्षेत्र भगवानगडाच्या ९१ व्या नारळी अखंड हरिनाम सप्ताहात कल्पतरुच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी भेट दिली. संत परंपरेचा वारसा आणि आध्यात्मिक ऊर्जेचं शक्तीस्थान असलेल्या या दोन्ही गडांना भेट देऊन त्यांनी सप्ताहात सहभाग घेतला. याप्रसंगी त्यांनी भगवान गडाचे महंत ह.भ.प. नामदेव शास्त्री महाराज, भगवानगडाचे उत्तराधिकारी ह.भ.प. कृष्णा महाराज शास्त्री नारायणगडाचे महंत ह.भ.प. शिवाजी महाराज, नारायणगडाचे उत्तराधिकारी ह.भ.प. संभाजी महाराज या संत-महंतांचे आशीर्वाद घेतले. या भेटींमधून त्यांना अमूल्य आध्यात्मिक प्रेरणा व ऊर्जा लाभल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी अनेक सहकारी व भाविक भक्तांचीही उपस्थिती होती, ज्यामुळे वातावरण भक्तिभावाने भारलेले होते.

# राजेवाडी येथील बौध्दविहाराच्या जागेवरील अतिक्रमण तात्काळ हटवा

तालुक्यातील राजेवाडी येथील भीमनगर बौद्धविहाराच्या नियोजीत जागेवर नारायण सोनपसारे यांनी अतिक्रमण करून ताबा घेतला असल्याने ग्रामस्थांनी सरपंच व ग्रामसेवक यांच्याकडे न्यायासाठी धाव घेतली आहे. राजेवाडी येथील नारायण संभाजी सोनपसारे यांनी गावातील भीमनगर भागातील बौद्धविहाराची नियोजित जागा हडप करण्याच्या उद्देशाने अतिक्रमण करून घेतली आहे. ग्रामस्थांनी वारंवार तोंडी सूचना दिल्या विनंती केली परंतु नारायण सोनपसारे हे कुनाचंही ऐकायला तयार नसल्याने शेवटी ग्रामस्थांच्या वतीने आर पी आय नेते गंगाधर सोनपसारे बहुजन विकास मोर्चा चे नेते अभिजीत पोटभरे व ग्रामस्थ महादेव सोनपसारे यांनी राजेवाडी येथील सरपंच व ग्रामसेवक यांच्याकडे धाव घेतली असुन लवकरात लवकर अतिक्रमण हटवुन बौद्धविहाराची जागा ताब्यात घेऊन समाज बांधवांच्या ताब्यात द्यावी अन्यथा उपोषण करण्यात येईल अशा अशयाची निवेदनाव्दारे मागणी करण्यात आली आहे.

# शारदा इंग्लिश स्कूल केज येथील इंटरॅक्टिव्ह स्मार्ट बोर्ड च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जागतिक शिक्षण प्रक्रियेस जोडण्याचा प्रयत्न-रमेशराव आडसकर

केज/प्रतिनिधी
शारदा इंग्लिश स्कूल केज शाळेने अल्पावधीतच यशाची प्रचंड भरारी घेतली असून शाळेत सातत्याने नवनवीन उपक्रम राबवण्यात येत असतात. आता शारदा इंग्लिश स्कूल केज शाळेतील शिक्षण स्मार्ट बनले असून फळा व खडूच्या जागी इंटरॅक्टिव्ह स्मार्ट बोर्ड च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे दिले जाणार आहेत. विद्यार्थ्यांना अध्यापन करताना आता शिक्षकांच्या हाती खडू ऐवजी डिजिटल पेन असणार आहे. पुस्तकाचे ऐवजी पेन ड्राईव्ह असणार आहे. सदरील इंटरॅक्टिव्ह स्मार्ट बोर्ड चे उद्घाटन रमेशराव आडसकर तसेच केज शहरातील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षण प्रेमी, पालक वर्ग, यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी बोलताना रमेशराव आडसकर यांनी सांगितले की



विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास करण्यासाठी संस्थेच्या वतीने सातत्याने अनेक उपक्रम राबविण्यात येत असतात. या उपक्रमाच्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरचे अत्याधुनिक ज्ञान मिळावे व विद्यार्थी,शिक्षक,शाळा आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडले जावेत हा प्रमुख उद्देश असल्याची त्यांनी पालकांना मार्गदर्शन करताना मत व्यक्त केले. यावेळी शाळेचे प्राचार्य मिश्रा एस.एम.यांनी पालकासमोर आपले मत व्यक्त करताना सांगितले की सदरील स्मार्ट बोर्ड हे टच स्क्रीन असणार आहेत त्याच्या मदतीने विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाच्या पलीकडे जास्तीत जास्त सखोल ज्ञान मिळावे हा प्रमुख उद्देश आहे. चालू घडामोडी, जगभरातील माहिती प्रत्यक्ष रूपाने पाहता येईल यासाठी सदरील उपक्रम शाळेच्या वतीने आमच्या मार्गदर्शिका श्रीमती अर्चनाताई आडसकर यांच्या सूचनेनुसार आम्ही राबवत आहोत. याचा निश्चितच फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे. यावेळी शाळेचे उपप्राचार्य सुरज सनी यांनी संस्थेच्या वतीने उपलब्ध केलेले इंटरॅक्टिव्ह स्मार्ट बोर्ड हे हाय स्पीड इंटरनेटने जोडलेले असून विद्यार्थ्यासाठी ज्ञानाचा खजिना असल्याचे मत त्यांनी मांडले. याचा फायदा विद्यार्थी निश्चितच,घेतील अशी खात्री त्यांनी व्यक्त केली.

यावेळी केज शहरातील प्रतिष्ठित व्यक्ती, शिक्षण प्रेमी, महिला पालक याची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. अतिशय खेळीमेळीचे आणि आनंदमय वातावरणात उद्घाटन सोहळा पार पडला.केज शहरातील व परिसरातील शाळेमधील हा पहिला उपक्रम असल्याचे मत पालकांच्या वतीने व्यक्त करण्यात येत होते. यावेळी सर्व पालकांनी विविध वर्गात जाऊन इंटरॅक्टिव्ह स्मार्ट बोर्ड ची हाताळणी कशी केली जाते हे प्रत्यक्ष जाऊन पाहिले. विद्यार्थ्यांशी चर्चा केली, संस्थेच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आलेल्या या सुविधेबद्दल त्यांनी संस्थेचे आभार मानले. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचे पालकांचे उपस्थितांचे आभार देशमुख पी. एम.यांनी व्यक्त केले व कार्यक्रमाचा समारोप केला.

### गप्पेवाडी-नामेवाडी येथील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत केलेले काम निकृष्ट दर्जेचे-शिवाजी केदार

# संबंधित गुत्तेदार व दोषी अधिकारी यांच्यावर कारवाई करा व संगनमताने झालेला निकृष्ट रस्ता चांगला न केल्यास उपोषणाचा इशारा

केज/ प्रतिनिधी:-केज तालुक्यातील गप्पेवाडी- नामेवाडी येथील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत केलेले काम हे निकृष्ट दर्जेचे असल्याची लेखी तक्रार शिवाजी केदार यांनी तहसीलदार केज यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील गप्पेवाडी नामेवाडी येथील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्त्याचे काम हे निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. सदर काम हे मे. कंट्रक्शन कंपनी, केज यांनी केलेले आहे. सदरील रस्ता बनवताना अगोदर बी.बी.एम. करणे गरजेचे होते परंतु सदर कंपनीने स्वतःच्या फायद्यासाठी हे काम निकृष्ट दर्जाचे केलेले असल्यामुळे या कामाचे बिल अदा करण्यात येऊ नये, तात्काळ एक उच्चस्तरीय समिती गठीत करून सदर कामाची सखोल चौकशी करून संबंधितांवर तात्काळ योग्य ती कारवाई करण्यात यावी, सदर काम हे अंदाज पत्रकानुसार करण्यात यावे, रस्त्याचे काम चालू असताना सदरचे काम हे निकृष्ट दर्जाचे आमच्या निदर्शनास येताच आम्ही ग्रामस्थांनी सदर कंपनीचे गुत्तेदार यांच्या मोबाईल



दूरध्वनी क्र.९९२१९९८४४४ या नंबर वर संपर्क साधला असता त्यांनी आम्हाला असे सांगितले की, तुमच्या रस्त्याचे काम हे चांगल्या प्रकारचे होत आहे. आम्ही म्हणालो की, आमच्या गावच्या रस्त्याचे काम चांगल्या क्वालिटीचे करा असे बोललो असता. सदर कंपनीचे गुत्तेदार हे असे म्हणाले की, आम्ही अंदाज पत्रकानुसारच काम करत आहोत. सदर काम हे उत्कृष्ट दर्जाचे होत आहे, त्यावर शिवाजी केदार असे म्हणाले की, सदर रस्त्यावरून बैलगाडी गेली असता रस्ता उघडत आहे. तेव्हा गुतेदाराने असे उत्तर दिले की, सदर काम हे जास्त जाडीचे झाल्यामुळे उखडत आहे. आज रोजी देखील सदर रस्त्याचे काम हे हाताने उखडून निघत आहे. सदर कामाची चौकशी करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत करून चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करून सदर कंट्रक्शन कंपनीचे नाव काळ्या यादीत टाकण्यात यावे. चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल न केल्यास आम्ही तहसील कार्यालयाच्या समोर आमरण उपोषण करणार असे लेखी निवेदनात शिवाजी केदार यांनी म्हटले आहे. सदर निवेदनाच्या प्रती तहसीलदार केज, जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय बीड, उपअभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग केज, पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे केज यांना दिल्या आहेत.

# वक्फ बोर्ड बिलविरोधात मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डकडून मानवी साखळी आंदोलन

बीड । प्रतिनिधी वक्फ बोर्ड बिलचा जोरदार विरोध करत ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डच्या वतीने संपूर्ण देशभरात मानवी साखळी आंदोलन सुरू करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून आज बीड येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रिडांगण येथे हजारो मुस्लिम बांधवांनी एकत्र येत आपला निषेध नोंदवला.या आंदोलनामध्ये सहभाग घेतलेल्या नागरिकांनी शांततामय मार्गाने वक्फ बोर्ड बिलविरोधात आपली भूमिका मांडली. यावेळी प्रसिद्ध धार्मिक वक्ते मुफ्ती मोहियोद्दीन यांनी आंदोलनकर्त्यांना वक्फ बिलाचे परिणाम व त्यातील तरतुदी याविषयी



मार्गदर्शन केले. या आंदोलनाच्या माध्यमातून केंद्र सरकारने वक्फ बोर्ड संदर्भातील नवे विधेयक मागे घ्यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.मुस्लिम समाजाच्या धार्मिक आणि सामाजिक हक्कांवर घाला घालणाऱ्या या बिलाचा तीव्र निषेध करत, देशभरात एकजूट दाखवत मुस्लिम बांधव आंदोलनाच्या माध्यमातून आपला आवाज बुलंद करताना दिसत आहे. वक्फ बिल विषय लोकांना मार्गदर्शन केले

# संतोष देशमुख हत्याप्रकरणात एसआयटी पथकात बदल, दोन अधिकाऱ्यांचा समावेश

बीड । प्रतिनिधी येथील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण करून निर्घुण हत्या करण्यात आली होती. या हत्या प्रकरणातील सर्व आरोपींवर मकोका अंतर्गत



कारवाई करण्यात आली आहे. तर या प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे हा गेल्या चार महिन्यांपासून फरार आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाच्या तपासाकरिता एसआयटी स्थापन करण्यात आलेली आहे. आता या प्रकरणातील दोषारोपपत्र देखील दाखल झाले असताना शासन निर्णयानुसार एसआयटी पथकात दोन अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. मयाफदोन अधिकाऱ्यांचा समावेश पोलीस हवालदार राजू वंजारे आणि पोलीस नाईक अनिल मंदे यांचा आता एसआयटीमध्ये समावेश करण्यात आला आहे. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे अद्यापही फरार असून त्याला अटक करण्यासाठी स्थानिक कर्मचाऱ्यांची मदत होऊ शकते. यामुळेच यांचा समावेश झाला असावा, अशी शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील तपासाकरिता नियुक्त करण्यात आलेल्या एसआयटीमध्ये आतापर्यंत झालेला हा तिसरा बदल आहे.

# 3 गावांत 10 बोअरचे अधिग्रहण मंजूर, 13 गावांचे प्रस्ताव सादर केज तालुक्यातील 16 गावांमध्ये पाणी टंचाई; उपाययोजनेची प्रतीक्षा

केज/प्रतिनिधी:-गतवर्षी केज तालुक्यात पाऊसकाळ चांगला झाल्याने मार्च महिन्यापर्यंत पाणी टंचाई भासली नाही. तर एप्रिल महिन्यात तालुक्यातील १३ गावात टंचाई जाणवू लागली आहे. मात्र या गावातून टँकरची नाही, तर बोअर अधिग्रहण करण्याची मागणी करण्यात आली आहे. तहसीलदार राकेश गिड्डे यांनी तीन गावात १० बोअर अधिग्रहण करण्यास मंजुरी दिली आहे.गतवर्षी १५ ऑगष्टनंतर झालेल्या दमदार पावसाने मांजरा धरण ओव्हरफ्लो झाले होते. लहान मोठ्या साठवण तलावात ही पाणी साठा झाला होता. शिवाय विहीर आणि बोअरची पाणी पातळी समाधानकारक राहिल्याने यंदा टँकर मागणीचे प्रस्ताव नाहीत गतवर्षी पाऊसकाळ चांगला झाल्याने तालुक्यात मार्च महिन्यापर्यंत पाणी टंचाई जाणवली नाही. तर टंचाई जाणवू लागलेल्या केज तालुक्यातील १३ गावातून बोअर अधिग्रहण करण्याची मागणी आली आहे. मात्र १५ एप्रिलपर्यंत तालुक्यातील कोणत्याही गावातून टैंकर मागणीचा प्रस्ताव आलेला नाही.रब्बी हंगामात पिकांना पाणी मिळाले. तर पाणी पुरवठा करणारे स्रोत सुरळीत सुरु राहिले. त्यामुळे मार्च महिन्या अखेरपर्यंत तालुक्यातील कोणत्याही गावात पाणी टंचाई जाणवली नाही. मात्र एप्रिल महिन्यात आता टंचाई निर्माण होताना दिसून येत आहे. गावातील सार्वजनिक पाणी पुरवठा करणारे स्रोत बंद पडल्याने सुरुवातीला बोअर अधिग्रहण करण्याची मागणी आलेल्या एकुरका, साबला, बेलगाव या गावचे प्रस्ताव पंचायत समितीच्या टंचाई विभागाकडून मंजुरीसाठी तहसील कार्यालयाकडे पाठविण्यात आले होते. संबंधित गावाची पाहणी झाल्यानंतर तहसीलदार राकेश गिड्डे यांनी एकुरका व साबला या दोन गावात प्रत्येकी तीन आणि बेलगाव येथे चार बोअर अधिग्रहण करण्यास मंजुरी दिली आहे. याशिवाय पाणी पुरवठ्याचे स्रोत बंद पडलेल्या जोला गावातून दोन बोअर,कापरेवाडीतून एक बोअर, वरपगावातून तीन बोअर, कोठी गावातून दोन बोअर, ढाकेफळ येथून तीन बोअर, जिवाचीवाडीतून एक बोअर, धर्माळा गावातून दोन भोपला येथून एक बोअर, उंदरी गावातून दोन बोअर अधिग्रहण करण्याच्या मागणीचे प्रस्ताव पंचायत समितीच्या टंचाई विभागाकडे आले होते. या नऊ गावातून १७ बोअर अधिग्रहण मंजुरीसाठी तहसील कार्यालयाकडे पाठविण्यात आल्याची माहिती पंचायत समितीच्या टंचाई विभागाचे कनिष्ठ लिपिक सरदार मासुमदार यांनी दिली. तर बुधवारी आवसगाव येथून ५ बोअर अधिग्रहण करण्याच्या मागणीचा प्रस्ताव पं. स. च्या टंचाई विभागाकडे आल्याची माहिती ही मासुमदार यांनी दिली.

# भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा व शहर शाखा महिला कार्यकारिणीची निवडीची बैठक संपन्न.

## तालूकाध्यक्षपदी महानंदाताई गायकवाड तर सरचिटणीसपदी मीरा खरात-गवळी व शहरध्यक्षपदी सुनीता कांबळे, शहर सरचिटणीसपदी सुरेखा मस्के यांची निवड.

केज/प्रतिनिधी
केज तालुका महिला शाखा व शहर शाखा यांच्या निवडीची बैठक केज शहरातील वेळुवन बुद्ध विहार येथे संपन्न झाली. यावेळी महिला तालुकाध्यक्षपदी महानंदाताई गायकवाड यांची निवड करण्यात आली तर सरचिटणीसपदी मीरा खरात-गवळी यांची निवड करण्यात आली. तसेच महिला शहराध्यक्ष म्हणून सुनिता कांबळे यांची निवड करण्यात आली तर महिला शहर सरचिटणीस म्हणून सुरेखा मस्के यांची निवड करण्यात आली. यावेळी,या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून महिला जिल्हाध्यक्ष कमलताई डोंगरे ह्या होत्या तर,या बैठकीला बीड पूर्वचे जिल्हाध्यक्ष बी.बी.धन्वे, एस.बी.शिंदे,एस. बी.मोरे, साळवे सर, व तालुकाध्यक्ष



बालासाहेब जोगदंड,सरचिटणीस पत्रकार रंजीत घाडगे, शहराध्यक्ष डॉ. प्रभाकर ठोके, सरचिटणीस जयपाल मस्के, तालुका कोषाध्यक्ष बळीराम सोनवणे, महेंद्र मस्के,गौरीताई सरवदे,साधनाताई बचुटे, संजिवनीताई धन्वे ,विद्याताई कांबळे,व उपासक-उपासिका व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तालुका व शहर कार्यकारणी पुढील प्रमाणे, करण्यात आली आहे. तालुकाध्यक्षपदी महानंदा गायकवाड,सरचिटणीस मीरा खरात-गवळी, कोषध्यक्ष विद्या कांबळे,संस्कार उपाध्यक्ष शामल सरवदे, पर्यटन प्रसार उपाध्यक्ष अनिता मस्के, संरक्षण उपाध्यक्ष ज्योती सोनवणे, संस्कार सचिव कौशल्या मस्के, संघटक तोळण कांबळे,शहरध्यक्षपदी सुनीता कांबळे, शहर सरचिटणीस सुरेखा मस्के,कोषाध्यक्ष रत्नमाला मस्के, उपाध्यक्ष संस्कार विजयमाला हजारे,संस्कार सचिव अयोध्या मस्के, सर्व संघटक मैनाबाई मस्के,सोजरबाई मस्के,कलावती हजारे,आशा मस्के,जनाबाई मस्के,प्रतिभा मस्के यांच्यासह भारतीय बौद्ध महासभा केज तालुका व शहर शाखेचे पदाधिकारी उपस्थित होते.

### बीड जिल्ह्यात होणार टाटा टेक्नॉलॉजीचा प्रकल्प 191 कोटीच्या प्रकल्पास मिळाली मान्यता

# ना. पंकजा मुंडे यांनी मानले पालकमंत्री अजित पवार यांचे आभार !



-बीड/ प्रतिनिधी:-जगप्रसिद्ध टाटा टेक्नॉलॉजी कंपनी बीड जिल्ह्यात सीआयआयटी प्रकल्प उभारणार आहे. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी मान्यता मिळाल्याने लवकरच हा प्रकल्प बीड जिल्ह्यात कार्यान्वित होणार आहे. एकूण एकशे एक्यानव कोटी रुपयांच्या खर्चातून उभारला जाणार हा प्रकल्प बीड जिल्ह्यातील होतकरू तरुणांसाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. जिल्ह्याच्या रोजगार आणि उद्योग क्षेत्राला गती देणारी संस्था जिल्ह्यात आणल्या बद्दल राज्याच्या पर्यावरण आणि पशूसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांचे आभार मानले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रबळ निर्णय क्षमतेमुळे जिल्ह्यात होत असलेला हा प्रकल्प तरुणांना स्वयंरोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करून देणारा आहे. जिल्ह्याच्या उद्योग क्षेत्राला देखील या प्रकल्पाचा फायदा होणार असून रोजगार वाढीच्या दृष्टीने देखील सीआयआयटी प्रकल्प फलदायी ठरणार आहे. टाटा समुहाच्या या प्रकल्पामुळे तरुणांच्या कौशल्याला वाव मिळणार असून जिल्ह्यातील सात हजार तरुणांना प्रतिवर्षी वैश्विक

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार १८ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



# माजी मंत्री आ.धनंजय मुंडेंचा शिरूर दौरा अचानक रद्द

शिरुर/प्रतिनिधी :- शिरुर कासार तालुक्यातील पिपळनेर येथे सुरू असलेल्या फिरत्या नारळी सप्ताहासाठी धनंजय मुंडे हे आज सकाळी मुंबईतून बीड जिल्ह्यातील शिरूर कासार येथे जाणार होते. परंतु धनंजय मुंडेंचा हा दौरा अचानक रद्द करण्यात आला आहे. काही तांत्रिक कारणांनी मुंबईतून विमान उड्डाण करण्यास परवानगी मिळत नसल्याने जड अंतःकरणाने हा दौरा रद्द करावा लागत असल्याचा खुलासा मुंडे यांच्याकडून करण्यात आला आहे. दौरा रद्द करण्याबाबत धनंजय मुंडे यांनी सोशल मीडियावर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटलं की, मी पिंपळनेर (ता. शिरूर कासार) येथील संत श्री भगवानबाबा यांच्या परंपरेतील नारळी सप्ताहात येण्यासाठी सकाळी साधारण दहा वाजल्यापासून मुंबई येथील पवन हंस विमानतळावर आहे. मात्र काही तांत्रिक कारणांनी अजूनही उड्डाण करण्यास परवानगी मिळत नसल्याने माझा आजचा पिंपळनेर (शिरूर कासार) दौरा जड



अंत:करणाने रद्द करावा लागतो आहे. अध्यात्मिक कार्यक्रमास आपल्यामुळे विलंब नको म्हणून याबाबतआदरणीय शास्त्री बाबांना कल्पना दिली आहे, अशी माहिती मुंडे यांनी दिली आहे. दरम्यान, दौरा रद्द करावा लागल्याबद्दल मी श्री क्षेत्र भगवानगड, आदरणीय महंत न्यायाचार्य ह.भ.प. डॉ. नामदेव महाराज शास्त्री तसेच समस्त पिंपळनेरच्या रहिवाशांची हृदयपूर्वक क्षमा मागतो, असंही धनंजय मुंडे यांनी म्हटलं आहे. केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर भाजप नेते आणि आमदार सुरेश धस विरुद्ध राष्ट्रवादीचे नेते आणि आमदार धनंजय मुंडे यांच्यात तीव्र राजकीय संघर्ष निर्माण झाला. देशमुख हत्या प्रकरणासह बीड जिल्ह्यातील इतर गुन्हेगारी घटनांवरून सुरेश धस यांनी धनंजय मुंडेंवर अनेक घणाघाती आरोप केले. आमदार धस यांनी केलेले आरोप आणि सरपंच हत्या प्रकरणात आढळलेला निकटवर्तीयांचा सहभाग यामुळे मुंडे यांनी आपलं मंत्रिपद सोडावं लागलं. या राजकीय संघर्षानंतर आज पहिल्यांदाच धनंजय मुंडे आणि सुरेश धस हे दोन्ही नेते सार्वजनिक कार्यक्रमात एकत्रित दिसण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र धनंजय मुंडे यांचा दौरा अचानक रद्द करण्यात आल्याने या चर्चेलाही आता पूर्णविराम मिळाला आहे.

# बीड जिल्ह्यात १५ दिवसात तीन हत्या!

बीड प्रतिनिधी : गेल्या काही महिन्यांपासून गुन्हेगारीच्या अनेक घटनांनी बीड महाराष्ट्राच्या केंद्रस्थानी आले आहे. दिवसाढवळ्या होणाऱ्या हत्या, बंदुकीचा धाक, धाकदपट, किरकोळ कारणातून मारहाण अशा घटनांनी गुन्हेगारीच्या टोकावर जाऊन थांबलेल्या बीड जिल्ह्यात चिकन विक्रीच्या वादातून अल्पवयीन मुलाला उचलून सिमेंटच्या नाल्यावर आदळल्याने त्याचा जागेवरच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. केज शहरात चिकन विक्रीच्या किरकोळ वादातून एक धक्कादायक घटना घडली आहे. रेहान कुरेशी नावाच्या अल्पवयीन मुलाचं दुसऱ्या एका अल्पवयीन मुलाशी वाद झाला. हा वाद वाढत गेला आणि आरोपीने रागाच्या भरात रेहानला उचलून थेट सिमेंटच्या नाल्यावर



आपटलं. डोक्याला गंभीर मार लागल्याने रेहानचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोपी अल्पवयीन असल्याने त्याचा शोध घेतला जात आहे. घटना केज मध्ये घडली असून रेहान कुरेशी असे मृत्यू झालेल्या मुलाचे नाव आहे. या प्रकरणात केज पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी अल्पवयीन आहे.तर याचा पोलिस अधिक तपास करत आहेत. धारूर तालुक्यातील कान्नापूर येथे स्वप्निल उर्फ बबलू देशमुख याची जुन्या वादातून हत्या झाली. अंबाजोगाईतील पोखरी रोडवर राजकुमार साहेबराव करडे या तरुणावर दोघा जणांनी कोयत्याने वार करून त्यास गंभीर जखमी केल्याची घटना घडली होती. ही घटना १ एप्रिल रोजी घडली होती.-यामध्ये करडे याच्या गळ्यावर, डोक्यात,पाठीवर वार करण्यात आले होते यात करडे गंभीर जखमी झाला होता.- जखमी राजकुमारचा स्वाराती रुग्णालयात उपचार सुरु असताना मृत्यू झाला. या प्रकरणी अंबेजोगाई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. भाजप बूथ विस्तारकाची हत्या.- माजलगाव येथील बाजार रस्त्यावर बाबासाहेब प्रभाकर आगे (वय ३० वर्षे) हे दुपारी २ वाजण्याचा सुमारास उभे असताना आरोपी नारायण शंकर फपाळ याने आगेवर कोयत्याने वार केला. यामुळे आगे यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना १५ एप्रिल रोजी घडली. घटनेनंतर आरोपी फपाळ स्वतः माजलगाव येथील पोलीस ठाण्यात कोयत्यासह हजर झाला. यावेळी त्याने या घटनेबाबतची पोलिसांना कबुली दिल्याची माहिती आहे.



श्रीक्षेत्र नारायणगडच्या नारळी सप्ताहाला (राक्षसभुवन तांबा) येथे लाखो भाविकांचा जनसागर उसळला महंत शिवाजी महाराजांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन झाले. यावेळी मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील ,आ. सुरेश धस, माजी.आ. बाळासाहेब आजबे, धनंजय देशमुख, महेबुब शेख, दिलीप गोरे, बी बी जाधव , ड. महादेव तुपे, बळीराम गवते , नितीन धांडे, राजेंद्र मस्के, गंगाधर काळकुटे , चंद्रकांत नवले, महेश दाभाडे सह जिल्ह्यातील भक्तगण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची शनिवारी परळीत बैठक

परळी । प्रतिनिधी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने परळी विधानसभा मतदारसंघाचा आढावा, पक्षाच्या विविध आघाडीवरील पदाधिकाऱ्यांच्या निवडी तथा कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याच्या अनुषंगाने शनिवार दिनांक १९ एप्रिल २०२४ रोजी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील राजेभाऊ फड यांच्या जनसंपर्क कार्यालयात ही बैठक सकाळी ११ वाजता संपन्न होणार आहे. या बैठकीस बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे तसेच पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह मान्यवर नेतेमंडळींची उपस्थिती असणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या परळी विधानसभा मतदारसंघातील सर्व सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच पक्षावर निष्ठा ठेवणाऱ्या सर्वांची महत्त्वपूर्ण बैठक शनिवार दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे तसेच पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या उपस्थितीत सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील राजेभाऊ फड यांच्या जनसंपर्क कार्यालयात ही बैठक संपन्न होणार

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले देशाचे भाग्यविधाते - प्राचार्य डॉ.वसुदेव ( बप्पा) गायकवाड



केज / प्रतिनिधीः- स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज. जि. बीड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतीराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी महात्मा ज्योती राव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.दोन्ही कार्यक्रमाचें अध्यक्ष म्हणून ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, ख्यातनाम वक्ते व व्याख्याते, प्राचार्य डॉ. वसुदेव ( बप्पा) गायकवाड हे होते.प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच रामराजे गायकवाड, राजसाहेब जाधव, दिव्या साबळे यांची उपस्थिती होती. तर प्रमुख व्याख्याते म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक छगननाना गायकवाड हे होते.अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड म्हणाले कि डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले हे देशाचे भाग्यविधाते व महानायक होते असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड हे होते.दोन्ही कार्यक्रमाचे प्रस्ताविक, सुत्रसंचलन, आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद( भैय्या) गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी,वाचक,हितचिंतक यांची उपस्थिती होती.

# गालावरून वारं गेलं; वाणी बंद, धनंजय मुंडेसाठी प्रार्थना करा, नामदेव शास्त्री यांचं आवाहन



भगवान गडाचे महंत नावदेवशास्त्री यांनी पुन्हा एकदा माजी मंत्री धनंजय मुंडेंची पाठराखण केली आहे. धनंजय मुंडे यांच्यासाठी सर्वांनी मिळून प्रार्थना करा, असं महंत नामदेव शास्त्री यांनी म्हटलं आहे. धनंजय मुंडेंच्या गालावरून वारं गेलं आहे. चांगली वाणी बंद पडली आहे. पहिल्या पदावर येऊन धनंजय मुंडे यांच्या हातून समाजाची सेवा घडावी असं नामदेव शास्त्री यांनी म्हटलं आहे. तसेच भगवान गडासोबत छेडछाड करू नका असंही ते यावेळी म्हणाले आहेत. त्यामुळे आता नामदेव शास्त्री यांचा रोख नेमका कोणाकडे आहे? अशी चर्चा आता सुरू झाली आहे. भगवान बाबा जेव्हा मारतात. तेव्हा त्या काठीचा आवाज येत नाही, असंही नामदेव शास्त्री यांनी यावेळी म्हटलं आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, गडावर सर्वजण एकोप्याने राहतात, आमच्यात खडे टाकू नका, ज्यांचं कल्याण करायचं आहे, त्यांनी या. हा वारकरी संप्रदाय आहे. जातीपातीच्या पलिकडचा संप्रदाय आहे. पण दुसरा शब्द सांगताना सांगून जातो. गडासोबत छेडखानी करू नका, भगवान बाबा जेव्हा पाहातातना तेव्हा आईच्या डोळ्यातून आलेलं प्रेम असं पाझरतं. पण जेव्हा ते मारतातना तेव्हा त्या काठीचा आवाज येत नाही पण जीवन उद्धस्त होतं. हजारो लोकांनी हे पाहिलेलं आहे, असंही यावेळी नामदेवशास्त्री यांनी म्हटलं आहे.

## नेमकं काय म्हणाले नामदेवशास्त्री?

मी जेव्हा फेटा बांधण्यासाठी गेलो तेव्हा मला फोन आला होता. आपल्या बीड जिल्ह्याचे भूमिपूत्र धनंजय मुंडे या कार्यक्रमाला येणार होते. ते दोन तास हेलीकॉप्टरच्या शेजारी बसले मात्र त्यांना क्लेअरन्स मिळाला नाही. त्यामुळे त्यांना येता आलं नाही. त्यांचा दौरा रद्द झाला. मला तर असं वाटतं की जे त्यांच्या गालावरून वारं गेलं आहे, सगळ्यांनी मिळून भगवान बाबांना प्रार्थना करा, एवढी चांगली वाणी जी बंद पडली आहे, ती सुरू व्हावी आणि पुन्हा पहिल्या पदावर येऊन समाजकल्याण त्यांच्या हातानं घडावं, एवढंच त्यांच्याविषयी आपण बोलू या, असं नावदेव शास्त्री यांनी म्हटलं आहे.



This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor-

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com